**नियमित दिवाणी दावा क्र.४४/२०२२ मधील**
**नि.क्र.१० वरील आदेश**

श्री. शिवाजी रामचंद्र देसाई
**वि.**
श्री. हणमंत रामचंद्र देसाई

प्रस्तुतचा दावा हा हक्कज्ञापन होऊन व कायम मनाई मिळणेकरीता दाखल केला आहे. नि.क्र.१० वर, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (यापुढे ज्याचा उल्लेख 'संहिता' असा करण्यात आला आहे.) चे क्रम ६, नियम १७, अन्वये दाखल केलेल्या अर्जाद्वारे वादी हे वादपत्रामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मागत आहेत. उपरोक्त आदेश हा याच अर्जावर असल्याने त्यातील कथनांची पुनरावृत्ती होऊन नये म्हणून या ठिकाणी उल्लेख करण्यात आलेला नाही. अर्जास वादी यांच्या शपथपत्राची पुष्ठी आहे.

२. प्रतिवादी क्र.१ व ४ यांनी अर्जाचे मागील बाजूस त्यांचा खुलासा सादर करून सदर अर्जास तीव्र आक्षेप घेतलेला आहे.

३. वादीतर्फे विधिज्ञ श्री. के.एस. सुरुतकर यांचा व प्रतिवादी क्र.१ व ४ तर्फे त्यांचे विधिज्ञ श्री. आर.वाय. दळवी यांचा तपशिलवार युक्तिवाद ऐकला.

४. दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे क्रम ६, नियम १७ पुढीलप्रमाणे उध्दृत करते. :-

> *"१७. न्यायालयास कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर दोहोंपैकी कोणत्याही पक्षकारास, त्याच्या वादकथनास न्याय्य असेल अशा रितीने व अशा अट्टींवर बदल करण्याची किंवा दुरुस्ती करण्याची मुभा देता येईल आणि पक्षकारांमध्ये वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न अभिनिर्णित करण्यासाठी आवश्यक असतील त्याप्रमाणे अशा सर्व दुरुस्त्या केल्या पाहिजेत.*

*परंतु, वाजवी दक्षता बाळगुन सुध्दा, वादाची चौकशी आरंभ होण्यापूर्वी, तो पक्ष, अशी दुरुस्ती मागणी करु शकली नाही असे न्यायालय निष्कर्षाप्रत आल्याशिवाय, दाव्याच्या सुनावणीची सुरुवात झाल्यानंतर, असा दुरुस्तीचा अर्ज मान्य करता येणार नाही."*

५. अभिलेखाची पाहणी केली असता वादी यांनी सदर दावा हक्कज्ञापन व कायम मनाई साठी दाखल केलेला आहे. वादी सुचवत असलेल्या दुरूस्तीस कारण दावा दाखल केल्यानंतर घडलेले आहे. त्यामुळे, वादपत्रामध्ये अधिक स्पष्टता येण्यासाठी सदर कथन दाव्यामध्ये येणे आवश्यक आहे. सदर दुरूस्तीमुळे उभयपक्षकारांमधील वादाचे एकाच दाव्यात निराकारण होणार आहे. अर्ज मंजुर केल्यावर उभयपक्षकारांमध्ये विविध प्रकरणे दाखल होऊन गुंतागूंत होणार नाही. वादी यांची अर्जातील दुरूस्ती मागणी कारण दावा दाखल झालेनंतर असल्याने सदर दुरूस्तीमुळे दाव्याच्या स्वरूपात कोणताही बदल होणार नाही. सदर प्रकरण दुरूस्तीमुळे गुणदोषावर न्यायनिर्णीत होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे, वादीचा प्रस्तुत अर्ज संहितेचे क्रम ६, नियम १७ अन्वये मान्य करता येईल. सबब, निम्न आदेश.

**आ दे श**

नि.क्र.१० वरील वादीचा वादपत्र दुरुस्तीचा अर्ज त्यांनी रक्कम रू.२००/– कॉस्ट शासनजमा करण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येत आहे.

वादीने या आदेशाच्या दिनांकापासून १४ दिवसाच्या आत उपरोक्त प्रमाणे वादपत्रात दुरुस्ती करावी व दुरुस्ती दाव्याची प्रत व त्याच्या पुरेश्या प्रतींसह व हुकूमनाम्यासाठीच्या प्रतीसह अभिलेखावर दाखल करावे.

DISTRICT COURT, MAHARASHTRA

Digitally signed by SHIPKULE CHARUDATTA
Date: 2024.05.04 15:03:24 +0530

दि. ०४/०५/२०२४.
चंदगड

(**चारूदत्त उद्धव शिपकुले**)
दिवाणी न्यायाधिश क. स्तर, चंदगड